**<u>नियमित दिवाणी दावा क्र.६५१/२०२३</u>**

**<u>निशाणी क्र.११५ वरील आदेश</u>**

वादीने प्रतिवादीकडून माळखांबी जांबुड रस्त्याचे मंजुरीपत्रक रस्त्याची वर्क ऑर्डर, रस्त्याचे रेखांकन ही महत्वाची कागदपत्रे दाव्यात दाखल करावी म्हणून अर्ज दिला आहे. मी वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने नि.क्र.४५ वर सदर दस्तऐवज व इतर माहितीसाठी अर्ज दिला होता, पण त्या अर्जावर प्रतिवादी क्र.२ ने दस्तऐवज दाखल करावे म्हणून आदेश पारीत केला. त्यानंतर नि.क्र.५१ वर प्रतिवादी क्र.२ ने दस्तऐवज दाखल करण्यास मुदत मागितले, परंतु अद्यापपर्यंत दस्तऐवज दाखल केले नाहीत.

२. वादग्रस्त रस्त्याचे रेखांकन सिध्द करण्यासाठी वादीने या अर्जात नमुद केलेले रस्तऐवज महत्वाचे आहेत आणि हे सर्व दस्तऐवज प्रतिवादी क्र.२ ते ५ यांच्या ताब्यात आहेत. दावा वादीच्या पुराव्यासाठी आहे. म्हणून दोन्ही पक्षातील वाद संपुष्टात येण्यासाठी वर नमुद दस्तऐवज महत्वाचे आहेत. म्हणून प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी वर नमुद दस्तऐवज पुढील तारेखपर्यंत दाखल करावेत.

स्वाक्षरीत/-

(उ.वि.जोशी)

दिनांक-१८/१०/२०२४.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

माळशिरस.